**म.वि.स./क-१ (आस्थापना)**

**दि. २ नोव्हेंबर, २०२०**

महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉक डाऊनच्या कालावधीतील मर्यादित उपस्थितीसंदर्भात महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाने शासन परिपत्रक क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम/१, दिनांक २९ ऑक्टोबर, २०२० रोजी निर्गमित केलेले परिपत्रक.

उपरोक्त शासन निर्णयानुसार लॉक डाऊनचा कालावधी दिनांक ३० नोव्हेंबर, २०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे. कोरोना विषाणूचा प्रसार व संसर्ग रोखण्यासाठी यापूर्वी या सचिवालयातील गट-अ व गट-ब अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती १०० टक्के प्रमाणे तसेच गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती ३० टक्के प्रमाणे करण्यात आली होती. तथापि, आगामी हिवाळी अधिवेशन सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२० रोजीपासून नागपूर येथे सुरु होणार असून उक्त अधिवेशनाच्या अनुषंगाने मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२० रोजी मुंबई येथील कार्यालय बंद होऊन नागपूर येथील कार्यालय गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजीपासून सुरु होणार आहे. नागपूर अधिवेशनाची कामकाजाची तातडी व निकड लक्षात घेता या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती १००% करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची १००% उपस्थिती पुढील आदेश होईपर्यंत कायम राहील.

**मा. सचिव यांच्या आदेशानुसार**

\\Mlsc101\d\E drive\2020\CORONA 2020\Presenty\2.11.2020\S.M.S..doc